## एकलहरे येथे नॅशनल एज्युकेशन फाउंडेशन तर्फे 'मानसिक तणाव' शिबिर आयोजन



नाशिक औ.वि.केंद्र, एकलहरे येथे नाशिक औष्णिक वीज केंद्रातील कामगारांच्या आरोग्याच्या दृष्टिने 'मानसिक तणाव' (औषध मुक्त जीवन) या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी नॅशनल एज्युकेशन फाउंडेशन, नागपूर यांच्या तर्फे दिनांक १२.०५.२००९ रोजी कॉन्फरन्स हॉल, टप्पा क्र. २ व पगार वाटप हॉल, प्रशासकीय इमारतीजवळ तसेच दिनांक १३.०५.२००९ रोजी कामगारांच्या कुटुंबियांसाठी ना.औ.वि.केंद्र, वसाहत, अधिकारी मनोरंजन क्लब शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिरामध्ये डॉ.शृंखला गणवीर यांनी मार्गदर्शन केले.

नॅशनल एज्युकेशन फाउंडेशन तर्फे तणाव मुक्त / औषधमुक्त जीवन जगण्यासाठी योगसाधना, मॅग्नेटिक थेरेपी, ॲक्युपंक्चर, वॉटर थेरेपी कसे आवश्यक आहे याबाबत डॉ. शृंखला गणवीर यांनी मार्गदर्शन केले. सदर शिबिरामध्ये नाशिक औ.वि. केंद्रातील अधिकारी / कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय यांनी मोठया संख्येने उपस्थित राहून लाभ घेतला.

## भुसावळ येथे निवृत्तीपर समारंभाचे आयोजन

भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र दीपनगर येथील १४ कर्मचारी अधिकारी यांना व्यवस्थापनाच्या वतीने सहृदय निरोप देण्यात आला. महिन्याच्या शेवटच्या दिवशी त्या त्या महिन्यात सेवा निवृत्त होणाऱ्या कर्मचारी अधिकारी अभियंता यांना व्यवस्थापनाच्यावतीने एका विशेष कार्यक्रमाद्वारे निरोप देण्यात येतो. अशाच प्रकारचा हा कार्यक्रम भु.औ.वि.केंद्राचे मुख्य महाव्यवस्थापक श्री.व्ही.एस. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. सदर प्रसंगी सर्व अधीक्षक अभियंते, विभाग प्रमुख, सर्व सेवानिवृत्त कर्मचारी अधिकारी अभियंता, सेवानिवृत्तांचे नातलग आणि मित्रमंडळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होती. कार्यक्रमादरम्यान सर्वश्री पी.एस. राऊळ, ए.आर. महाजन, व्ही.एस. पाटील, डी.टी. महाजन, आर.जी. साळी, जी.ए. पाटील, पी.बी. पाटील, टी.आर. तायडे, बी.के. कोळी, पी.के. सपकाळे, डी.आर. तायडे, डी.एन. तायडे, ए.जी. कवठे, एम.जी. तायडे यांना निरोप देण्यात आला. सर्व सेवानिवृत्तांना व्यवस्थापनातर्फे गुणगौरव पत्र, शाल-श्रीफळ तसेच त्यांच्या पत्नीस साडी भेट देऊन सत्कार करण्यात आला.

प्रसंगी मुख्य महाव्यवस्थापक व्ही.एस. पाटील यांनी आपले विचार मांडले. महानिर्मिती कंपनीच्या यशामध्ये आपला सर्वांचा मोलाचा हातभार आहे. महानिर्मितीच्या यशस्वी वाटचालीमध्ये आपण सर्वांनी आपापल्या आयुष्याची महत्वाची वर्षे खर्ची घातलेली आहेत. आपले सर्वांचे योगदान अमूल्य असे आहे. आपणा सर्वांना पुढील आयुष्य आनंदाचे, भरभराटीचे जावो अशा शुभेच्छा प्रसंगी त्यांनी दिल्या. दर महिन्यात मोठया संख्येने कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत, या महिन्यात खुपच म्हणजे १४ कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत. कर्मचारी जसजसे सेवानिवृत्त होत आहेत तसतसे कर्मचारी भरती प्रक्रिया राबवावी लागणार आहे, अशी धोरणात्मक माहिती त्यांनी दिली. प्रभारी महाव्यवस्थापक व्ही.पी. खाडीलकर यांनी निरोप सत्कारमूर्ती व त्यांच्या कुटुंबियांचे आभार मानले. १४ कर्मचारी सहपत्नी या कार्यक्रमास हजर होते. हा एक जम्बो निवृत्तीसमारंभ भुसावळ औ.वि.केंद्राने अनुभवला. कामगार संघटनांच्या प्रतिनिंधींनी आपले मनोगत व्यक्त केले. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आपले भावपूर्ण मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आणि आभार सी.एस. सपकाळे यांनी मानले.

## नाशिक औ.वि. केंद्र येथे अग्निशमन सेवा सप्ताह संपन्न



नाशिक औ.वि.केंद्र येथे अग्निशमन सेवा सप्ताह उत्साहात पाळण्यात आला. सप्ताहा निमित्त ना.औ.वि. केंद्रात वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. त्याचप्रमाणे केंद्रीय गृहमंत्रालयाने दिलेल्या ''स्मोक अलार्म लावा-जीवन सुरक्षित ठेवा'' या घोषवाक्याचे हिंदी व मराठी भाषेतील कापडी बॅनर्स केंद्रात, वसाहत व तसेच महत्वाच्या सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आले. तसेच या घोषवाक्यावर निबंध स्पर्धा सुद्धा आयोजित करण्यात आली.

१४ एप्रिल रोजी मा.मुख्य महाव्यवस्थापक श्री.एस.बी. खराबे यांच्या हस्ते दिप प्रज्वलीत करून अग्निशमन सेवा सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना बिल्ले व पॉकेट कॅलेंडर्स वाटप करण्यात आले. १५ एप्रिल ते १७ एप्रिल दरम्यान अग्निशमन प्रात्यक्षिके व व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्याचप्रमाणे हाऊस किपींग संबंधीचे माहितीपत्रक कर्मचाऱ्यांमध्ये वाटप करण्यात आले. तसेच अग्निसुरक्षेसंबंधीचे पोस्टर्स वेगवेगळया जागी लावण्यात आले. १८ एप्रिल रोजी संवाद वाहिनीवर अग्निशमन संबंधी दृकश्राव्यफित दाखविण्यात आली. २० एप्रिल रोजी अग्निशमन सेवा सप्ताहाचा समारोप व बक्षीस वितरणाचा कार्यक्रम मा.मुख्य महाव्यवस्थापक श्री.एस.बी. खराबे यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडण्यात आला.

या कार्यक्रमास महाव्यवस्थापक श्री.पी.एम. चौधरी व श्री.जी.एम. पचारे अधीक्षक अभियंता श्री.सी.व्ही. पेटकर, श्री.आर.व्ही. पाठक, श्री.आर.बी. सोनटक्के, श्री.बी.एम. मेश्राम, श्री.पी.एस. चौधरी, श्री.व्ही.एस. कोंपल्ली उपस्थित होते. निबंध स्पर्धेत भाग घेणारे श्री.डॉ.पी.आय. ठोंबरे, रसायनतज्ञ, जलप्रक्रिया विभाग - २ श्री.नि.य. जोगळेकर, कनिष्ठ अभियंता, टर्बाईन यु.-१ टप्पा क्र. १ यांना अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांकाचे स्मृती चिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शशीम एम.झाडे, उप अग्निशमन अधिकारी यांनी केले. तर आभार प्रदर्शन सुनील सुळेकर, सुरक्षितता अधिकारी यांनी केले. मुख्य महाव्यवस्थापक श्री.एस.बी. खराबे यांनी उपस्थित सर्वांना अग्निसुरक्षे संबंधी शपथ दिली. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी व यशासाठी श्री.डी.डी. देशपांडे, ए.के. सांत्रा, श्री.एम.जे. चौगुले, श्री.ए.एल. वाकेकर, श्री.एस.जी. गायकवाड, श्री.एन.एस. सुरसे, श्री.एन.एफ. फुगट, श्री.बी.व्ही. पाटील, श्री.आर.व्ही. आरोटे, अंकुश रोडे व इतर कर्मचारी वर्ग यांनी परिश्रम घेतले.



चंद्रपूर औ.वि. केंद्रातील कोळसा हाताळणी विभागास संचालक (संचलन) श्री.मधुकर शेलार यांची भेट.